R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ६०

दि.१३ फेब्रुवारी २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भांडवलदारांना देश विकण्यासाठी आणलेले नवीन चार कामगार कायदे तात्काळ रद्द करा अन्यथा संपूर्ण देशाची चाके थांबवण्याची कामगारांमध्ये ताकद : कॉम्रेड धनंजय कुलकर्णी

:'इज ऑफ डूइंग बिजनेस' च्या नावाखाली भांडवलदारांना उद्योग करताना कामगारांचे अधिकाधिक शोषण करून अधिक नफा वसूल करता यावा या उद्देशाने आजपर्यंत संघर्ष करून मिळविलेले वेगवेगळे कामगार कायदे रद्द करून नवीन चार कामगार कायदे या शासनाने आणलेले आहेत. 'चार कामगार कायदे' कामगारांच्या हिताची असल्याचे सरकारकडून अनेकदा सांगण्यात येत आहे परंतु कुठल्याही क्षेत्रातील कामगारांनी या कामगार कायद्यांची मागणी केलेली नाही तसेच प्रत्येक क्षेत्रातून या नवीन कामगार कायद्यांना विरोध होतो आहे तरीसुद्धा केवळ भांडवलदारांना व परकीय गुंतवणुकीला येथील उद्योगांमध्ये कामगारांचे शोषण करून अधिकाधिक नफा मिळविता यावा केवळ या एका उद्देशाने सरकारने देशभरातील सर्व संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारावरती हे कायदे लादलेले आहेत. अगदी ब्रिटिश काळापासून कामगारांनी संघर्ष करून वेगवेगळे अधिकार व हक्क मिळवलेले आहेत. त्यामुळे कामगार सध्या उपभोगत असलेले अधिकार व हक्क हे कुठल्याही सरकारने मेहरबानीने कामगारांना दिलेले नसून कामगारांच्या प्रदीर्घ संघर्षातून त्यांनी ते मिळविलेले आहेत. पाशवी बहुमताच्या जोरावर सरकारला हे वाटत आहे की आपण आजपर्यंत संघर्षातून मिळवलेले अनेकांचे या प्रकारचे अधिकार सहजरित्या बदलून आपणास हवे ते कायदे आपण यांच्यावरती लादु शकतो परंतु कामगारांच्या एकजुटीचा व कामगारांच्या ताकदीचा या सरकारला कुठलाही अंदाज नाही. कामगार विरोधी असलेले हे कायदे तात्काळ भारत सरकारने मागे घ्यावे अन्यथा कामगार वर्गास भारतातील प्रत्येक क्षेत्राची चाके थांबविण्याची क्षमता नाईलाजाने वापरावी लागेल हे शासनाने ध्यानात घ्यावे असा इशारा बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी दिला.




नवीन कामगार कायद्यामुळे युनियन स्थापन करणे,संप आयोजित करणे,सक्षम नवीन नेतृत्व निर्माण करणे या सर्व गोष्टी अधिकाधिक कठीण केल्या जात आहेत. भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशात आज करोडो युवक उच्चशिक्षित असून सुद्धा बेरोजगार म्हणून समाजात वावरत आहेत. बेरोजगारी सारखा अतिशय मोठा प्रश्न असताना व युवकांच्या हाताला कायमस्वरूपी रोजगाराची गरज असताना सुद्धा 'फिक्ड टर्म एम्प्लॉयमेंट'सारखी नवीन कलमे या कामगार कायद्याद्वारे आणून केवळ तीन ते चार वर्षासाठीच कामगारांची भरती केली जाते आहे व त्या ठराविक मुदतीनंतर कर्मचाऱ्यांना घरी पाठविले जाणार आहे. संपूर्ण आयुष्यभर आपल्या हाताला रोजगार असणे हा आपला मूलभूत अधिकार असताना 'फिक्ड टर्म एम्प्लॉयमेंट'च्या नावाखाली केवळ विशिष्ट अल्प मुदतीच्या कालावधीसाठीच नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते आहे. हे युवकांच्या भविष्याशी खेळणे आहे. कामाचे अनिश्चित तास व कामगारांना कामावरून काढून टाकण्यासाठी अनेक क्लिष्ट परवानग्यांची गरज नसणे यासारख्या अनेक कामगार विरोधी गोष्टी अंतर्भूत केल्या जात आहेत ज्याला आपण एक दिलाने व संपूर्ण ताकतीने विरोध करायला हवा म्हणूनच आजचा संप हा अटळ बनलेला आहे असे बँक कर्मचाऱ्यांचे युवा नेते कॉम्रेड दीपक माने यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित करताना म्हटले.

केंद्र सरकार आयएमएफ,वर्ल्ड बँक इत्यादी संस्थांच्या दबावाखाली येऊन वित्त भांडवलाच्या हिताचे निर्णय घेऊ पाहत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका,विमा कंपन्या, ऋखउ यामधील निरगुंतवणूक हा त्याचाच एक भाग आहे. एकीकडे आत्मनिर्भर भारताच्या घोषणा करायच्या तर दुसरीकडे फायद्यात असणाऱ्या व सरकारला अमाप लाभांश मिळवून देणाऱ्या संस्था निर्गुंतुणकीच्या माध्यमातून परकीय भांडवलासाठी खुल्या करायच्या व येथील लोकांच्या हिताला बाधा पोहोचवायची हे धोरण सरकार राबवीत आहे. सरकारने खाजगीकरणाचे हे धोरण तात्काळ थांबवावे अन्यथा कामगारांना बेमुदत संपावर जावे लागेल असा इशारा विमा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड कमलाकर एचवाड यांनी दिला.

भारत–अमेरिका व्यापार करार असो की नवीन चार कामगार कायदे असो या मार्गाने सरकार देशातील जनतेला पुन्हा पारतंत्र्यात ढकलू पाहत आहे. अशा निर्णयामधून भारत आपली स्वायत्तता अधिकाधिक गमावीत आहे व येथील जनतेला आर्थिक, राजकीय,सांस्कृतिक पारतंत्र्यात ढकलीत आहे याचा निषेध म्हणून आज आम्ही संपामध्ये उतरलो आहोत असे महाराष्ट्र स्टेट बँक एम्पलोयीज फेडरेशन अध्यक्ष कॉम्रेड धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. सरकारने नवीन कामगार कायदे तात्काळ रद्द करावीत,सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी,सर्व ठिकाणचे कंत्राटीकरण रद्द करून कायमस्वरूपी नोकऱ्या बेरोजगारांना द्याव्यात,मोठ्या कर्जबुडव्याकडून तात्काळ कर्जाची वसुली करण्यात यावी, नवीन व्यापार करारानुसार अमेरिकेकडून होणारी कृषी आयात तात्काळ थांबवावी या सर्व मागण्यासह देशभरातील प्रमुख १० संघटना संपामध्ये उतरल्या होत्या. तीव्र निदर्शने,मोर्चे, मोटर सायकल रॅली यासारखे निषेधाचे व आंदोलनाचे वेगवेगळे मार्ग वापरून देशभरामध्ये संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी कॉम्रेड परमेश्वर बडगिरे, कॉम्रेड कलीम पठाण, कॉम्रेड महेश गांधले, कॉम्रेड सदाशिव मुगावे यासह लातूर शहर व परिसरातील बँकिंग व विमा क्षेत्रातील शंभर पेक्षा अधिक कर्मचारी उपस्थित होते.

## नूतन महापौरांनी घेतला मनपाच्या कामकाजाचा आढावा;सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने सूचना



लातूर/ प्रतिनिधी: लातूरच्या नवनिर्माचित महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व उपमहापौर स्नेहल उटगे यांनी गुरुवारी (दि.१२) मनपातील अधिकाऱ्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला. रविवारपासून सुरू होणारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने त्यांनी विविध सूचनाही केल्या.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी व उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रारंभिक अधिकाऱ्यांचा व विभाग प्रमुखांचा परिचय करून देण्यात आला.नूतन महापौर व उपमहापौरांनी मनपाचे कामकाज समजून घेतले. पाणीपुरवठा, पथदिवे, अग्निशमन,आरोग्य तसेच सर्व विभागांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

महाशिवरात्री निमित्त रविवार दि.१५ फेब्रुवारी पासून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेला सुरुवात होत आहे.या यात्रेच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या तयारीचा आढावाही महापौरांनी घेतला. यात्रेत मनपाच्या वतीने पाण्याचे टँकर भरून दिले जाते. त्याबाबत माहिती घेतली. यात्रा परिसर व यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पथदिव्यांची दुरुस्ती याबाबतही त्यांनी सूचना केल्या. यात्रा परिसरात गरज पडली तर अग्निशमन दल सेवा तत्पर असावी, असेही महापौरांनी सांगितले. यात्रेच्या अनुषंगाने जे-जे करणे आवश्यक आहे त्या सर्व बाबी प्राधान्याने कराव्यात,असे त्या म्हणाल्या.

दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व परिसराची स्वच्छता, आवश्यक तेथे डागडुजी व सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

या बैठकीस गट नेते विजयकुमार साबदे,नगर सेवक धोंडिराम यादव, सचिन गायकवाड,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.



## लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावरील अविश्वास प्रस्ताव : संसदीय परंपरेची कसोटी

भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये लोकसभा अध्यक्षपद हे अत्यंत प्रतिष्ठेचे आणि तितकेच जबाबदारीचे मानले जाते. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन सभागृहाचे संचालन निष्पक्ष, संतुलित आणि नियमांच्या चौकटीत ठेवणे ही अध्यक्षांची मूलभूत जबाबदारी असते. अशा परिस्थितीत जर अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा ठराव मांडला जात असेल, तर तो केवळ एका व्यक्तीविरोधातील राजकीय पाऊल नसून, संसदीय परंपरा आणि लोकशाहीच्या कार्यपद्धतीवरील गंभीर प्रश्न उपस्थित करणारी घटना ठरते.

अध्यक्षपदाची घटनात्मक भूमिका

भारतीय संविधानाच्या कलम ९३ नुसार लोकसभा अध्यक्षांची निवड होते. निवडीनंतर अध्यक्षांनी पक्षीय भूमिका बाजूला ठेवून सभागृहाचे कामकाज चालवणे अपेक्षित असते. प्रश्नोत्तरांचा कालावधी, शून्यकाल, विधेयकांवरील चर्चा, अविश्वास प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव अशा विविध प्रक्रियांमध्ये अध्यक्षांची भूमिका निर्णायक असते. ते नियमांचे अंतिम व्याख्याते मानले जातात.

यामुळेच अध्यक्षपदावर असलेल्या व्यक्तीवर सर्व पक्षांचा विश्वास असणे आवश्यक असते. जर विरोधकांना असे वाटू लागले की अध्यक्ष पक्षपातीपणे वागत आहेत, तर ते लोकशाहीसाठी चिंताजनक संकेत मानले जातात.

अविश्वास प्रस्तावाची पार्श्वभूमी

अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्याची तरतूद संसदीय नियमांमध्ये आहे. तो प्रस्ताव सभागृहातील किमान सदस्यांच्या समर्थनासह मांडला जातो. या प्रक्रियेचा उद्देश अध्यक्षांच्या कामकाजावर असमाधान व्यक्त करणे हा असतो.

ओम बिर्ला यांच्या कार्यकाळात विविध महत्त्वाची विधेयके, चर्चा आणि गदारोळाच्या घटना घडल्या. विरोधकांकडून वेळेचे नियोजन, चर्चा मर्यादित ठेवणे, काही सदस्यांचे निलंबन किंवा स्थगन प्रस्तावांना परवानगी न देणे यासंदर्भात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. सत्ताधारी पक्षाच्या मते मात्र अध्यक्षांनी नियमांच्या चौकटीत राहूनच निर्णय घेतले आणि सभागृहातील शिस्त राखण्याचा प्रयत्न केला.

संसदीय कामकाजातील तणाव

गेल्या काही वर्षांत संसदेत गदारोळ, घोषणाबाजी, कामकाज ठप्प होणे या घटना वाढल्याचे दिसते. अशा परिस्थितीत अध्यक्षांवर दुहेरी दबाव असतोएकीकडे कामकाज सुरळीत चालवण्याची जबाबदारी आणि दुसरीकडे सर्व पक्षांना न्याय देण्याची गरज.

विरोधकांचा आरोप असा असतो की महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा घेण्यास विलंब केला जातो किंवा चर्चा मर्यादित केली जाते. सत्ताधारी पक्षाचा युक्तिवाद असा असतो की सभागृहातील शिस्त भंग झाल्यास अध्यक्षांना कठोर निर्णय घ्यावे लागतात. या दोन्ही बाजूंच्या तर्कांमध्ये सत्याचे काही अंश असू शकतात. प्रश्न मात्र असा आहे की लोकशाहीतील संवादाची जागा कमी होत चालली आहे का?

अध्यक्षांची निष्पक्षता : धारणा की वास्तव?

अध्यक्षांनी निर्णय घेताना नियमांचा आधार घेतला असला तरी त्यांच्या निर्णयांविषयीची ‘धारणा’ देखील महत्त्वाची ठरते. लोकशाहीमध्ये केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नसते; निष्पक्ष दिसणेही तितकेच आवश्यक असते. जर मोठा विरोधी गट सतत असंतोष व्यक्त करत असेल, तर त्या भावना गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

तथापि, अविश्वास प्रस्ताव हा केवळ राजकीय दबाव निर्माण करण्याचे साधन ठरू नये. अध्यक्षपदाचे अवमूल्यन होईल अशा पद्धतीने वारंवार प्रस्ताव मांडणे हीही संसदीय परंपरेसाठी धोक्याची बाब ठरू शकते.

लोकशाहीसाठी व्यापक अर्थ

अध्यक्षांविरोधातील अविश्वास प्रस्ताव हा केवळ संख्याबळाचा खेळ नसतो; तो लोकशाहीच्या आरोग्याचे निदर्शक असतो. जर संसदेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विश्वासाचा अभाव वाढत असेल, तर त्याचे परिणाम विधिमंडळाच्या कार्यक्षमतेवर होतात. महत्त्वाची विधेयके चर्चेविना मंजूर होणे किंवा विरोधकांचा आवाज दाबला जात असल्याची भावना निर्माण होणे, या दोन्ही गोष्टी लोकशाहीसाठी घातक आहेत.

याउलट, विरोधकांनीही संसद ही संघर्षाचे नव्हे तर संवादाचे व्यासपीठ आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सातत्याने गदारोळ करून कामकाज ठप्प करणे आणि त्यानंतर चर्चा न झाल्याची तक्रार करणेया विरोधाभासालाही गांभीर्याने पाहावे लागेल.

पुढील मार्ग

या पार्श्वभूमीवर काही मुद्द्यांवर विचार होणे गरजेचे आहे:

महत्त्वाच्या विषयांवर चर्चेसाठी ठरावीक वेळेची हमी देण्याची यंत्रणा मजबूत करणे.

संसदीय नियमांचे पुनरावलोकन करून अधिक पारदर्शक प्रक्रिया विकसित करणे.

सर्वपक्षीय बैठकींना अधिक प्रभावी बनवणे.

अध्यक्षांनी वेळोवेळी सर्व पक्षांचा विश्वास संपादन करण्यासाठी संवाद वाढवणे.

लोकसभा अध्यक्ष हे केवळ सभागृहाचे नियंत्रक नसून, लोकशाही मूल्यांचे संरक्षक असतात. त्यांच्यावर अविश्वास प्रस्ताव येणे ही गंभीर बाब असली, तरी त्यातूनच संसदीय व्यवस्थेला आत्मपरीक्षणाची संधी मिळू शकते.

निष्कर्ष

ओम बिर्ला यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्ताव हा केवळ राजकीय घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. तो भारतीय लोकशाहीतील संवाद, सहिष्णुता आणि परंपरांचा कस पाहणारा क्षण आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही संसदेची प्रतिष्ठा आणि जनतेचा विश्वास सर्वोच्च मानून वर्तन करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाहीचे बळ हे केवळ बहुमतामध्ये नसते; ते परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि संवादामध्ये असते. अध्यक्षपदावरील व्यक्ती आणि सर्व राजकीय पक्षांनी या मूलभूत तत्त्वांचा सन्मान राखला, तरच संसदेचे मंदिर म्हणून असलेले स्थान अबाधित राहील.

# व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे ;भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाहीला घातक ठरू शकते.

भारतात अनेक धर्म,पंथ,भाषा,जाती व धर्माप्रमाणे संस्कृती आहे.तरीही भारतीय युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करतांना दिसतात ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. आजच्या सोशल मीडियाच्या युगात युवा पिढीमध्ये भारतीय संस्कृतीचा दिवसेंदिवस विसर पडत असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येते.१४फेब्रुवारी म्हटले की युगलांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येते. परंतु यात ते भारतीय संस्कृतीचे भान विसरतांना दीसतात. जगात संपूर्ण देश आप–आपल्या संस्कृतीची जोपासना करतात.परंतु बदलत्या काळात सध्या भारतीय युवा वर्ग पाश्चिमात्य देशांमधील संस्कृतीकडे वळतांना दीसतात. ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे.भारत आपल्या संस्कृतीच्या बळावर अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे व जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात उभरत असतांना पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाही देशाला घातक ठरू शकते.१४ फेब्रुवारीला व्हेलेंटाईन डे संपूर्ण जगासह भारतीय युगल मोठ्या थाटामाटात साजरा करतात.परंतु हा दीवस संपूर्णपणे भारतीय संस्कृतीच्या विरोधात असल्याचे मी समजतो. व्हेलेंटाईन डे साजरा करायला हरकत नाही.परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे.कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.भारतात अनेक जाती–धर्माचे लोक रहातात.त्याचप्रमाणे या पावनभुमित अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक वेशभूषा व आगळीवेगळी संस्कृती आपल्याला पहायला मिळते. आपण देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून किंवा टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरा नंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगलांनी करायला पाहिजे.आज जगातील अनेक देश भारतीय संस्कृती अवगत करण्याच्या मार्गावर आहेत.याचे उदाहरण कुंभमेळ्यात किंवा भारतीय सणांमध्ये दिसून येते.भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशांतील नागरिक भारत भ्रमन करतांना दिसतात.भारतात ३६५ दिवसातील प्रत्येक दिवसाला प्रत्येक धर्मामध्ये आगळे–वेगळे महत्व असते हे आपणा सर्वांनाच माहित आहे.योगाची सुरूवात भारतातुनच झाली आणि योगाला संपूर्ण जगाने स्वीकारले जगातील मुस्लिम राष्ट्र असो किंवा कोणतेही राष्ट्र असो योगाला जास्त महत्व देतात हीच जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये आहे याची जाण युवकांनी ठेवली पाहिजे.त्याचप्रमाणे आयुर्वेद शास्त्र भारतातुन विकसित झाले व हजारो पध्दतीची औषधी युक्त वृक्ष भारतात पहायला मिळते.परंतु आपली युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळतांना दीसते हे भारतीय देवभुमिचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी सर्वच धर्मांचे लोक आनंदाने रहातात. सोबतच भारत हा ऋशी–मुनिंचा, सुफी–साधु–संत, महाज्ञानी, क्रांतीकारक, स्वतंत्रता सेनानी,थोरपुरूषांच्या अथक प्रयत्नाने सुसंस्कृत भारत देश मोठ्या डौलाने उभा आहे. याभुमित भगवान राम, भगवान गौतम बुद्ध, महंमद पैगंबर, गुरू गोविंदसिंग इत्यादीसह अनेक देवी–देवतांचे वास्तव्य या भारत भुमीत आपल्याला पहायला मिळते. त्यांच्याच पुण्यायीने भारतीय संस्कृती विकसित झाली आहे.भारतावर सर्वच धर्माच्या देवी–देवतांचा आशिर्वाद आहे. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध, जैन इत्यादी धर्माचा मोठा पगडा भारतीय संस्कृतीवर आहे.त्यामुळेच आज भारतात एकोप्याचे व खेळीमेळीचे वातावरण दिसून येते.ऐवढी अफाट आणि शक्तीशाली भारतीय संस्कृती असतांना भारतीय युगलांनी व युवकांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा किंवा पध्दतीचा अवलंब का करावा?व्हेलेंटाईन डे च्या माध्यमातून भारतीय संस्कृती धोक्यात येवु शकते याला नाकारता येत नाही.याचा विचार युवा पिढीतील युगलांनी करावा. व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती नुसारच साजरा करावा.कारण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाश्चिमात्य पध्दती भारतात घर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.याला रोखण्याची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. हीबाब आजच्या नवीन पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास अवश्य करावा. परंतु त्याचा अवलंब करू नका ही माझी आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत दौ–यावर असताना त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रषंशा केली होती. परंतु अमेरिकेत गेल्यावर ६ फेब्रुवारी २०१५ ला भारतीय संस्कृतीवर ताशेरे ओढताना ते म्हणतात की गेल्या काही वर्षांपासून भारतात असहिष्णुता वाढली आहे.याचाच अर्थ असा की बोलतांना सांगायचे की तुमची संस्कृती चांगली आहे आणि मायदेशी गेल्यावर दुसऱ्याच्या संस्कृतीला असहिष्णुता म्हणायचे व आपल्या पाश्चिमात्य पध्दतीचा प्रचार करायचा हा कुठला न्याय? मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतात सर्व धर्मांचे,जातीचे, पंथाचे लोक एकोप्याने रहातात ही बाब रूतली असावी.त्यामुळे मित्रांनो पुन्हा सांगतो की भारतीय संस्कृतीलाच स्वीकारावे व पाश्चिमात्य पध्दतीला टाटा– बाय–बाय करावे.कारण जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती अनभिज्ञआहे.भारतात रामायण, गीता, कुराण, बायबल, ग्रंथ या पाच भुजांनी बनलेला भारत व भारतीय संस्कृती आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची जोपासना करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे.मी पुन्हा एकदा सांगु ईच्छीतो की व्हेलेंटाईन डे या दीवसाला भारतीय संस्कृतीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी युगलांनी घ्यावी.भारतीय संस्कृती इतकी अबाध्य आहे की अनेक वृक्ष, फुले व फळे संस्कृतीला धरून आहे.त्यामुळे जगाच्या दृष्टीकोनातून भारतीय निसर्ग सृष्टी आगळीवेगळी दीसुन येते.आज भारत आपल्या दुश्मन देशालासुध्दा मदत करीत आहे यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती होय.आठवड्याचे ७ दीवस असतात.परंतु भारतीय संस्कृतीत प्रत्येक धर्मासाठी सातही दिवसाला वेगवेगळे महत्त्व दीसुन येते.सुर्य,चंद्र,तारे संपूर्ण जग पहाते परंतु भारतात यांची वेगवेगळ्या पध्दतीने जोपासना करून प्रत्येक धर्माच्या माध्यमातून पुजा–अर्चना केली जाते.भारतीय संस्कृतीला देवी–देवतांनी भरपूर काही दिले जे जगात तुम्हाला कुठेही पहायला मिळनार नाही. आज भारतात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा पहायला मिळतो यातुनच सप्तरंगी धनुष्य तयार होतो.वर्षाचे १२ महीने असतात त्यात आपल्याला आगळ–वेगळ रूप,रंग पहायला मिळते. त्यामुळे भारतीय संस्कृतीची बरोबरी कोणताही देश करू शकत नाही आणि करणार नाही.करिता भारतीय संस्कृतीची जोपासना केलीच पाहिजे व पाश्चिमात्य संस्कृतीचा त्याग केला पाहिजे असे मला वाटते.कारण भारतीय संस्कृती ही जगातील अजुब्यातील एक अजुबा आहे. आपण व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती प्रमाणेच साजरा करावा. व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने आई–वडिल, बहिण–भाऊ यांचा आदरतिथ्याने सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा यातच आपली संस्कृती आहे.यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होवून नवचैतन्य दिसून येईल. या दिवसाला बदलते हवामान व वाढते प्रदुषण पहाता युगलांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प करावा. त्याचप्रमाणे युगलांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की,१४ फेब्रुवारी २०१९ ला पुलवामा येथे भारतीय सैन्यावर आतंकवाद्यांनी आत्मघाती हल्ला केला होता यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला हा दिवस भारतासाठी अत्यंत दुःखद दिवस ठरला.त्यामुळे व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून शहिदांना सुध्दा श्रद्धांजली वाहने गरजेचे आहे.शहिदांना कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सत्तेच्या जवळ अहंकार पोटी दूर

चंद्रपूर मध्ये मागील महिन्यात महानगर पालिकेच्या निवडणुका झाल्यात बऱ्याच नोक झोकी मध्ये आप आपल्या पद्धतीने उमेदवार निवडून ही काँग्रेस,आणि बीजेपीची आलीत त्यात प्रतिभा धानोरकर खासदार आणि विरोधी पक्ष नेता विजय वडेट्टीवार यांनी आप आपली माणसे निवडून आणण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. आणि त्यात २७ नगर सेवक निवडून देखील आलीत. ती विरोधी पक्ष नेता विजय वटडेट्टीवार ची किंवा खासदार प्रतिभा धानोरकर ची म्हणण्यापेक्षा ती काँग्रेस ची होती हे म्हणणे संयुक्तिक होईल. काँग्रेस ची जनविकास सेना सोबत युती असल्याने त्याकडे ३० हा आकडा होता. केवळ चार नगर सेवक ची गरज होती. नंदू नगरकर आणि दानव यांना तिकीट काँग्रेस नी नाकारल्या मुळे त्यानी अपक्ष निवडणूक लढविली आणि ते निवडून देखील आलेत.अर्थात त्याची वैयक्तिक अस्तिव होत. आणि ती काँग्रेस चे पूर्वीचे असल्यामुळे काँग्रेस च्या काही लोकांनी त्याला प्रथम पसंती दिली असावी म्हणजे त्याचे वैयक्तिक कार्य, जनतेची सहानुभूती, आणि काही काँग्रेस च्या लोकांचे प्रेम जिव्हाळा यामुळे ते निवडून आले. म्हणजे ती नाराज काँग्रेस चीच माणसे होती. नेत्याचे आदय कर्तव्य असते की आपला कोणताही व्यक्ती दुखावला जाऊ नये. आणि जर दुखावला गेला असेल तर त्याचा झालेला समज, गैरसमज दूर करणे हे नेत्याचे आदय कर्तव्य असते. काहींनी प्रयत्न केला असेल काहींनी केला नसेल पण त्यात मात्र विजय दादा आणि प्रतिभा ताई अयशस्वी ठरल्या.

या दोन्ही नेत्याच्या आपसातील शेवट पर्यंत असलेल्या वर्चस्व वादा मुळे यांना दुसऱ्या नगर सेवकां सोबत पाहिजे तशी साठ गाठ करता आली नाही. त्यामुळे उबाठा, वंचीत, आणि दोन काँग्रेस चीच पूर्वी असलेली आणि नाराज होऊन अपक्ष राहून निवडून आलेली माणसे, बी एस पी, एम आय एम या सोबत पाहिजे त्या प्रमाणात जमवून घेता आले नाही.या सर्व कारणाने चंद्रपूर येथील महापौर पद काँग्रेसच्या हातून निसटले हे नाकारता येत नाही.आणि या सर्व प्रकाराला नेत्यातील आपशी संघर्ष कारणीभूत असल्याचा चर्चेचा विषय संपूर्ण चंद्रपूर आणि महाराष्ट्र मध्ये झालेला आहे. दुसऱ्या बाजूला आमदार सुधीर मुनगंटीवार आणि आमदार किशोर जोरगेवार यांचेही तिकीट वाटपा पासून तर निवडून आप आपले समर्थक आल्या नंतर देखील मतभेद राहिलेले आपल्याला दिसले. त्याचाही खूप मोठा आपशी मतभेद दिसून आला पण देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेळीच हस्त क्षेप केला आणि सुधीर मुनगंटीवार आमदार याकडे जबाबदारी दिल्याचे सांगितले जाते. तसे सुधीर मुनगंटीवार माजी मंत्री राहिलेले आहेत. बीजेपी चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पण होते सतत ते निवडून सहा वेळा आलेले आहेत. बोलण्यात माहीर आहेत. बुद्धी चातुर्य त्याच्यात आहे. त्यानी अगदी संदीप गिऱ्हे जिल्हा प्रमुख शिवसेना उबाठा यांच्या सोबत संपर्क साधला, त्याना विश्वास मध्ये घेतले. वंचीत आणि उबाठा मिळून निवडणूक लढल्यामुळे ते संदीप गिऱ्हे सोबतच असल्याची त्यानी खात्री करवून घेतली. अपक्ष यांना सोबत घेतले आणि महापौर बीजेपी चाच होणार अशी बातमी टाकून दिली आणि अक्षरशः संगीता खांडेकर ला महापौर बनविले.

इकडे काँग्रेस ही उबाठा आणि वंचीत आपल्या सोबतच असल्याचे त्यानी गृहीत धरले पाहिजे पण त्याना पाहिजे त्या प्रमाणात विश्वासामध्ये घेतले नाही. विजय दादा आणि प्रतिभा ताईचे शेवट पर्यंत आपशी मतभेद चालू होते. शेवटी मिटविण्यासाठी दिल्ली पर्यंत जावे लागले याचा फायदा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी छक्का मारून घेतला आणि तो बाजीगर झाला आणि महाराष्ट्र मध्ये चर्चेचा विषय ठरला. जनतेने काँग्रेसला कौल जरी जास्त दिला असला तरी त्याचा फायदा घेता येत नसेल, म्हणजे बाजीगर होता येत नसेल तर काय फायदा? शेवटी सत्ता महत्वाची आहे आणि ती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर येथील महापौर देऊन आपल्या कडे खेचून आणली हे नाकारता येत नाही.

बीजेपी कडे केवळ २४ नगर सेवक होते. खर तर सुधीर मुनगंटीवार आमदार हे अव्वल राजकारणी आहेत. विद्यार्थी दशेपासून त्यानी सुरु केलेला प्रवास हा जिल्हा, विदर्भ, महाराष्ट्र आणि देश पातळीवर दखल घेण्यासाठी बाध्य करणारा आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. त्यानी दैनिक महाविदर्भ चंद्रपूर मधेही संपादक म्हणून काम केल्यामुळे त्याना केव्हा कोणते स्टेटमेंट द्यायचे याची चांगली जाणीव आहे. विधानसभा मध्ये ही एखादा प्रश्न लावून धरण्यात ते माहीर आहेत त्यानी अनेक निधी खेचून आणला. त्यानी बोललेले होते ते म्हणजे मी विदर्भ राज्य करणारच? हे शिल्लक राहिलेले आहे. आणि बऱ्याच दिवसा पासून विदर्भवादीची अपेक्षा आहे की, विदर्भ राज्य व्हावे.आता जनतेची एकच इच्छा आहे की, विदर्भ राज्य झाले पाहिजे. अचानक आता विदर्भाचाच मुख्यमंत्री,सन्माननिय, देवेंद्र फडणवीस आहेत.आणि सुधीर भाऊ मुनगंटीवार आमदार साहेब प्रश्न निकाली काढण्यात माहीर आहेत. सत्तेत असणारा नेता सुधीर भाऊ विदर्भ राज्य निर्माण करेल या अपेक्षेत चंद्रपूर वाशीय आणि विदर्भातील जनता आहे. काही सत्तेच्या जवळ असतांना,अहंकार आणि अज्ञान पोटी सत्ता उपभोगता येत नाही. ते सत्तेपासून दूर जातात. हे मात्र निश्चित, जे चंद्रपूर मधील जनतेनी पाहिलेले आहे. ही बाब चंद्रपूर, विदर्भ, महाराष्ट्र आणि देशालाही लागू पडते. हे विशेष.

**अविनाश टिपले-**
**९९७०९१७३८९,चंद्रपूर.**

# ज्योतिष विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांना राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार जाहीर

लातूर : उल्लेखनीय अध्यात्मिक साधना, समाजाभिमुख कार्य आणि निस्वार्थ सेवाभावासाठी ज्योतिष विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांना धगधगती मुंबई वृत्तपत्र समूहाच्या वतीने राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

पुणे येथे कार्यरत असलेले विजयकुमार स्वामी हे केवळ ज्योतिषशास्त्राचे अभ्यासक नसून, समाजालाच ईश्वर मानून सेवा करणारे सेवाव्रती व्यक्तिमत्वाचे धनी म्हणून ओळखले जातात.

आपल्या ज्योतिषज्ञानाचा उपयोग त्यांनी कधीही वैयक्तिक स्वार्थासाठी न करता समाजातील दु:खी, कष्टी व उपेक्षित घटकांच्या जीवनात आशेचा प्रकाश निर्माण करण्यासाठी केला आहे. संत तुकाराम महाराजांच्या जे का रंजले गांजले, त्यासी



म्हणावे आपले या विचारांचे ते मूर्तिमंत उदाहरण मानले जातात. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर, पुस्तके वाटप, गरजूंना ब्लँकेट वितरण, विद्यार्थी वसतिगृह व वृद्धाश्रमांमध्ये अन्नदान असे अनेक उपक्रम सातत्याने राबवले आहेत.

त्यांनी स्थापन केलेली भक्ती प्रकाशन ही संस्था गेल्या पंधरा वर्षांपासून कार्यरत असून, दसरा व दिवाळीच्या पर्वावर प्रकाशित होणारा 'भविष्य' वार्षिकांक समाजप्रबोधनाचे कार्य करत आहे. या प्रकाशनातून मिळणारे उत्पन्नही समाजकार्यासाठी अर्पण केले जाते. हा पुरस्कार सोहळा लवकरच स्वर्गीय अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर ४/५, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यापुरस्काराच्या घोषणेने विद्यावाचस्पती विजयकुमार स्वामी यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

# नोंदणी व मुद्रांक विभागात 'गट-ड' संवर्गातील,उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध

लातूर : नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरीता आय,बी,पी,एस. कंपनीमार्फत जुलै-२०२५ मध्ये ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनाकरीता बोलाविण्यात येणार आहे. याबाबत विभागाच्या ्‌ igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्थळ व दिनांक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी कळविले आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गासाठीच्या परीक्षेचा निकाल २० ऑगस्ट २०२५ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला होता. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आणि गुणवत्तेनुसार उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीअंती निवड यादी, प्रतिक्षा यादी, निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी, अपात्र उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर उमेदवारांची यादी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या संकेतस्थळावर १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# जिल्हा युवा पुरस्कार २०२४-२५ साठी अर्ज करण्यास २५ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

लातूर, : राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. या पुरस्काराद्वारे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला जातो आणि युवा विकासाच्या क्षेत्रात अधिक कार्य करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम १० हजार रुपये असे आहे, तर नोंदणीकृत संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम ५० हजार रुपये इतके आहे. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र युवक, युवती आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, अपेक्षित प्रमाणात प्रतिसाद न मिळाल्याने जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार अर्ज सादर करण्याची संधी पुन्हा देण्यात येत आहे. जिल्हा युवा पुरस्कार २०२४-२५ साठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आहे. इच्छुक युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथून अर्ज प्राप्त करून घ्यावेत. अर्जासंबंधित अधिक माहितीसाठी बाबासाहेब इंगोले, क्रीडाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान

लातूर: नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील निवडक गावांमध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करून शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब करावा, या उद्देशाने हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत लागवड तंत्र, हमखास यशाचा मंत्र या विषयावर दूरदृश्य पद्धतीने (युट्युब लिंकद्वारे) विशेष वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. हे वेबिनार http://youtube.com/c/PoCRMaharashtra या युट्युब चॅनेलवर थेट पाहता येईल.

खरीप हंगामातील तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अवलंब मे-जून महिन्यात होत असला तरी, त्याची पूर्वतयारी फेब्रुवारीपासूनच सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होतो, त्यांचा दृष्टिकोन बदलतो आणि बेड मेकर, पेरणी यंत्रे, जैविक निविष्ठा तसेच इतर आवश्यक साधनांची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित होते.

या अभियानाचा भाग म्हणून प्रकल्पामार्फत फेब्रुवारी महिन्यापासून तंत्रज्ञानाविषयी ऑनलाईन वेबिनार आणि डिजिटल शेतीशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या मार्गदर्शनपर कार्यक्रमाचा लाभ घ्यावा आणि हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादकता वाढवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

# मुंबई शहर जिल्ह्यासाठी ८१३ कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी वाढीव मागणीसह ८१३ कोटी ३५ लाख ७२ हजार रकमेच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ७८५.३५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २८ कोटी आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांसाठी ७२ हजार इतक्या रकमेचा समावेश आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून होणारी विकास कामे विहित कालमर्यादेत, गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करावीत. यासाठी कार्यान्वयीन यंत्रणांनी, टीम वर्कने मंजूर निधी विहित कालावधीत १०० टक्के खर्च करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. तसेच ज्या यंत्रणा त्यांचा मंजूर निधी व कामे विहित कालावधीत पूर्ण करणार नाहीत अशा यंत्रणेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीची बैठक उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वर्ल्ड ट्रेड सेंटर येथील सेंट्रम हॉलमध्ये झाली. बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार सर्वश्री सचिन अहिर, सुनील शिंदे, प्रसाद लाड, मनिषा कायंदे, चित्रा वाघ, अजय चौधरी, अमीन पटेल, महेश सावंत, मनोज जामसुतकर, शिवाजीराव गर्जे, जगन्नाथ अभ्यंकर, ज्योती गायकवाड, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, जिल्हाधिकारी आंचल गोयल, जिल्हा नियोजन अधिकारी विजय भोपळे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संदीप बकरे यांच्यासह जिल्हा नियोजन समितीचे सन्माननीय सदस्य व जिल्हास्तरीय यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंजूर निधी १०० टक्के खर्च करा-२०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सर्वसाधारण योजनेसाठी ४०६.४२ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना २१.०४ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तर कार्यान्वयीन यंत्रणांना सर्वसाधारण योजनेसाठी २७४.१४ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १२.६ कोटीचा निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीमधून सर्वसाधारण योजनेमधून १२५.९२ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ५.२४ कोटी असा १३१.१६ कोटीचा निधी खर्च झाला असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. मुंबई शहर जिल्हास २०२५-२०२६ मधील मंजूर निधी १०० टक्के खर्च होण्यासाठी आवश्यकतेनुसार पुनर्विनियोजन करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली.



विकास कामे दर्जेदार व्हावीत- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई शहर हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे शहर आहे. या शहरात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून केली जाणारी कामे अत्यंत दर्जेदार असावीत. मुंबईत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला या कामांचा हेवा वाटावा अशी विकास कामे व्हावीत. यासाठी यंत्रणांनी टीम वर्कने कामे करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लोकप्रतिनिधींनी बैठकीत मांडलेल्या सूचना, उपस्थित केलेले प्रश्न महत्वाचे आहेत. या सूचनांची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन हे प्रश्न मार्गी लावावेत. शहरातील उद्यानांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी आणि शौचालय व्यवस्था करण्यात यावी. भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी कायमस्वरुपी डॉग शेल्टर करण्यासाठी महापालिकेने जागा निश्चित करावी. शहरात रहदारीच्या ठिकाणी नागरिकांना कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये यासाठी अशा ठिकाणांची महापालिकेने तपासणी करून त्या ठिकाणाचे अनधिकृत स्टॉल काढण्याची कार्यवाही करावी.

बाजारपेठांमध्ये मोबाईल टॉयलेट व्यवस्था-शहरातील बाजारपेठेंमध्ये नागरिकांची विशेषत: महिलांची गैरसोय होऊ नये, यासाठी अशा ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था निर्माण करावी. या बरोबरच शहरात फिरते शौचालय सुरू करण्याबाबतही आवश्यक कार्यवाही करावी.महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून नागरिकांना दर्जेदार विनासायास आरोग्य सुविधा या बरोबरच महापालिकेच्या रुग्णालयात झिरो प्रिस्क्रिप्शन सुविधा रुग्णालयात दिले जात असलेल्या आरोग्य सेवेत ज्या आजारावरील उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट नाहीत असे आजार योजनेत समाविष्ट करण्यासाठी महापालिकेने शासनास प्रस्ताव सादर करावा, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

बांगलादेशी घुसखोरी संदर्भात प्रशासनाने संबंधितांच्या कागदपत्रांची तपासणी करावी. तसेच संशयित कागदपत्रे रद्द करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. शहरात अपघात रोखण्यासाठी महापालिका, पोलीस, परिवहन व संबधित विभागाने समन्वयाने उपाययोजना राबवाव्यात. शहरातील विजेच्या प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी. दादर येथील शिवाजी पार्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभीकरण करावे. तसेच शहरातील फूटपाथ हे अतिक्रमणमुक्त, सुरक्षित, स्वच्छ राहतील याची खबरदारी महानगरपालिकेने घ्यावी,असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

कोस्टल रोड तसेच महालक्ष्मी रेस कोर्स येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची उद्याने विकसित करण्यात येत असून ती सबवेच्या माध्यमातून जोडण्यात येणार असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले गिरणी कामगारांना मुंबईत घरे देण्यासाठी काम सुरू आहे. शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गाभा क्षेत्रासाठी ५९८.३८ कोटी-२०२६-२७ मधील प्रारूप आराखड्यातील प्रस्तावित नियतव्ययामध्ये सामाजिक व सामूहिक सेवा, कृषी व संलग्न सेवा आणि ऊर्जा विकास या गाभा क्षेत्रासाठी ५९८.३८ कोटी रुपये, सामान्य आर्थिक सेवा, सामान्य सेवा या बिगर गाभा क्षेत्रासाठी १७६.९७ कोटीचा समावेश आहे. तर नावीन्यपूर्ण योजनेसाठी १० कोटीचा समावेश आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ आराखड्याची वैशिष्ट्ये-वंचित असणाऱ्या घटकांचे जीवनमान उंचावणे व त्यांच्या मूलभूत समस्या सोडविण्याकरिता जिल्हा विकास आराखड्यात विशेष भर.जिल्ह्यातील कोळी बांधवांची संख्या विचारात घेता व्यवसायाचे सुलभीकरण करण्याकरिता बंदरांचा विकास. रोजगार उपलब्ध करण्याकरिता पर्यटन स्थळांचा विकास व कामगार कल्याणासाठी माफक दरात सोयी सुविधा उपलब्ध करणे. पीएम सूर्यघर बिजली योजनेंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये सौरऊर्जा उपकरणे बसवण्याचे उद्दिष्ट. नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करणे तसेच वंचित घटकांचे स्थलांतर / पुनर्वसन व धोकादायक दरडीखाली राहणाऱ्या झोपडपट्टी वासीयांच्या संरक्षणार्थ विशेष तरतूद. महिला सबलीकरण व त्यांच्या मूलभूत सुविधांकरिता प्राधान्य. राज्य, देश, विदेशातून येणाऱ्या रुग्णांना शासकीय रुग्णालयात अद्ययावत सेवासुविधा उपलब्ध होण्याकरिता रुग्णालयांचे अद्ययावतीकरण. गतिमान प्रशासनासाठी शासकीय कार्यालयांना इमारती, पोलीस व तुरुंग विभागाच्या मजबुतीकरणासाठी आधुनिक तंत्रज्ञान पुरविणे, तसेच आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण.

शासकीय महाविद्यालयांचे अद्ययावतीकरण, तसेच युवकांना किमान कौशल्यांसाठी व व्यायामशाळा क्रीडांगणे तयार करण्यासाठी खास तरतूद. शाश्वत विकासाचे ध्येयजिल्हा सापेक्ष शाश्वत विकास ध्येयपूर्तीच्या दृष्टीने जिल्हा वार्षिक योजनेत आरोग्य (निरोगीपणा आणि क्षेमकुशलता) शिक्षण (दर्जेदार शिक्षण), लिंग समानता डिसेंट वर्क आणि आर्थिक वाढ, हवामान कृती आणि जलसृष्टी या घटकांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. यामध्ये आरोग्याच्या अनुषंगाने (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांना यंत्रसामग्री व साधन सामग्रीसाठी) २४२.४२ कोटी, शिक्षणासाठी ३१.४६ कोटी, लिंग समानतेच्या अनुषंगाने ( जिल्हा महिला व बाल विकास) १३.८८ कोटी, चांगल्या दर्जाचे काम आणि आर्थिक वाढीच्या अनुषंगाने (उद्योग सहसंचालक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, सहाय्यक संचालक कौशल्य विकास) १० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. हवामान कृतीच्या अनुषंगाने वातावरणातील बदलामुळे होणाऱ्या परिणामांसाठी (महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण) ३.२० कोटी शासकीय इमारतीवर सौर ऊर्जा उपकरणे बसवण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला असून जलसृष्टीच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना ३० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाचे शताब्दी वर्ष-१९११ मध्ये कस्टम विभागाचे कार्यालय जुन्या जकात घर इमारतीत सुरू झाले होते. त्यानंतर १९२२ मध्ये ही इमारत जिल्हाधिकारी तसेच इतर शासकीय कार्यालयांना देण्यात आली. मुंबईचे पहिले जिल्हाधिकारी म्हणून जी. ए. थॉमस यांनी १ एप्रिल १९२७ रोजी पदभार स्वीकारला होता. २०२६-२७ हे मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे या वर्षात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी गोयल यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यास २०२५-२०२६ मध्ये प्राप्त निधी, प्रशासकीय मान्यता, झालेला खर्च, २०२६-२७ साठीची तरतूद याबाबतची माहिती दिली.प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

# कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर जयंती साजरी.



केज/प्रतिनिधी-जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर जयंती साजरी. त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन करण्यात आले.त्यागमुर्ती व बलिदानाची मूर्ती आदरणीय रमामाई आंबेडकर यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळजवळ वणंदगाव येथे दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला.वडील भिक्षु धोत्रे व आईचे नाव रुक्मिणी होते.त्यांचा विवाह महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी १९०६ मध्ये झाला.त्यांनी डॉ.बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी व सामाजिक कार्यात खंबीर पाठिंबा दिला.रमामाईंनी त्यागमयी जीवन व उपासमार सोसून प्रतिकूल परिस्थितीत घर सांभाळून सामाजिक कार्यात डॉ. बाबासाहेबांना खंबीर साथ दिली.त्यांनी अस्पृश्य मुलींसाठी आनंदीबाई आंबेडकर कन्या शाळा सुरू केली.त्यांचा दीर्घ आजाराने दि.२७ मे १३५ रोजी मुंबईत मृत्यू झाला.आदरणीय त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर ह्या सामाजिक कार्यासाठी आदर्श प्रेरणा स्थान आहेत. असे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.या शाळेचे प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ रामकिशन ग्यानबा मुळे सर, गणित विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर, श्री राहुल बजरंग बचुटे सर, श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.त्यागमुर्ती रमामाईंच्या जयंती निमित्त शाळेत निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या.या कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षिका वृंद, पिएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार, अनिता पवार, विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षणप्रेमी नागरिक अंगणवाडीताई व मदतनिस हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी केले.श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनी आभार मानले.

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती. संघटनेकडून धरणे सत्याग्रह निवेदन



लातूर :- सरकारी व निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बी.बी. गायकवाड, कार्याध्यक्ष महादेव पांचाळ, उपाध्यक्ष आर.एस.तांदळे, महसूल संघटनेचे दत्तात्रय सूर्यवंशी व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रलंबित विविध मागण्याचे धरणे सत्याग्रह निवेदन लातूर येथील निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मा. मुख्यमंत्री स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलव्य करुन देण्यात यावे, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा, राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा. तसेच पूर्वाश्रमिच्या ग्रामपंचायतींमधील कायम असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे. सर्व सरकारी कर्मचारी/निवृत्तीवेतनधारक/कंत्राटी-रोजंदारी कर्मचारी यांना सर्व महत्वाच्या इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी व्यापक स्वास्थ्य विमा योजना लागू करावी. सेवानिवृत्तीचे वय ६० करा. १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी/रोजंदारी/अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा. १०. एकवेळची वाव म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या द्या. अनेक विभागात लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रदिर्घ काळ कार्यात्मक उच्च पदाच्या पदोन्नतीपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अपेक्षित वेतन वृध्दीचा लाभ संबंधितांना मिळत नाही. यावावत सुधारित धोरण करण्यात यावे. पीएफआरडीए कायदा रद्द करण्यात यावा व फंड मॅनेजरकडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी. सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हिंसक हल्ल्यांविरुध्द कडक कारवाई व्हावी यासाठी आयपीसी कलम ३५३ मध्ये दुरुस्ती करुन कलम ३५३ अजामिनपात्र करण्यात यावे. सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्या संदर्भातील कार्यवाहीचा वेग वाढवावा. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ च्या शासन निर्णयाची पुनर्स्थापना करा.

ज्या विभागाने सेवाभरती नियम व आकृतीबंधास अद्याप शासन मंजुरी घेतलेली नाही, त्यांना अशी मंजुरी विहित मुदतीत घेण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात. शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा अशा कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत.

रास्त प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक दिसून आलेला आहे. आपण संवेदनशील असल्यामुळे, संघटनांनी मांडलेले प्रश्न आपण नेहमीच आपुलकीने समजून घेतलेले असले तरी, काही जिव्हाळयाच्या प्रश्नांबाबत निर्णयासाठी आंदोलन, निदर्शने करण्याची वेळ राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेसह विविध संघटनांवर येऊ नये, अशी सर्व कर्मचाऱ्यांची विनंती आहे.

# लातुरात अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा







लातूर: केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी आज १२ फेब्रुवारी रोजी कामगार संघटनानी देशभर संप पुकारला होता. त्याचाच भाग म्हणून अखिल महाराष्ट्र

जनरल कामगार संघटनेच्या वतीने आज सकाळी १२ वाजता साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चाचे नेतृत्व कामगार नेते तथा अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी केले.

मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, कामाच्या तासांत वाढ करू नये, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करण्यात यावी, सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/ कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करण्यात यावे, लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करण्यात यावा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे

आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या. लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाला वाजत गाजत सुरुवात झाली. त्यानंतर मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देत गंजगोलाई, महात्मा गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. कामगार नेते राजकुमार होळीकर, लेबर युनियचे नेते सुधीर देशमुख, बसवंतआपा उबाळे, प्रा. सुधीर अनवले, इंजि. शफी शेख यांची भाषणे झाली. त्यानंतर मोर्चाच्या शिष्ठमंडळाने नवीन जिल्हाधिकारी येथे जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई

शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ व इतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# एकात्म मानव दर्शन विचाराने भारत विश्वगुरु होण्यापूर्वी विश्वमित्र होईल : प्रकाश पाठक



लातूर : संपूर्ण जगाला आज विध्वंसाची भीती आहे. मात्र, लढू नका हे जगाला पटवून देईल तेव्हा भारत विश्वगुरू होईल आणि एकात्म मानव दर्शन विचाराने आपला भारत देश विश्वगुरु होण्यापूर्वी विश्वमित्र होईल, असे प्रतिपादन नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक सीए प्रकाश पाठक यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला - २०२६ चे प्रथम पुष्प बुधवारी सायंकाळी सीए प्रकाश पाठक यांनी ' एकात्म मानव दर्शन ' या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशीलदादा वाजपायी हे होते. मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे , प्राचार्य डॉ. विक्रम माने , प्राचार्य रविंद्र शेंडगे ,शैलेश कुलकर्णी, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सीए प्रकाश पाठक यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि उपस्थितांना आपल्या ओघवत्या वाणीने अक्षरशः मंत्रमुग्ध केले. ' विकास' या शब्दाचा स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतचा शब्दप्रयोग नेमका काय असतो, हे त्यांनी उत्कृष्टरित्या समजावून सांगितले. विकासाला सगळी परिमाणे आपण आर्थिक लावत असतो. विकास हा या एकाच मुद्द्यावर विसंबून नसतो. तरीही विकासाची मूलभूत उद्दिष्ट्ये समानार्थाने वापरात आणली जातात.

आपल्या व्याख्यानात प्रकाश पाठक यांनी विविध पैलूंवर प्रकाश टाकला. पंडित दीनदयाळ यांचा विचार हा वैश्विक कल्याणाचा विचार आहे. समग्रपणे, समरसतेने, समृद्धतेसाठी केलेले चिंतन हे कल्याणासाठी केले जाते. एकात्म म्हणजे समग्र सृष्टीचा विचार होय. यात मानव, प्राणी, पक्षी, पर्यावरण, निसर्ग या सर्वांचा विचार होय. व्यक्ती, कुटुंब, समाज, सृष्टी, परमेष्टी म्हणजे समग्रता. विचार हा एका वर्तुळाभोवती केंद्रभूत करू नका. प्रत्येक घटकाचा वेगवेगळा विचार करावा. दुसऱ्याचा विचार करण्याचे चिंतन हे भारतीय समाजाचे लक्षण आहे. समाजात प्रेम, आदर वाढावावा, दुसऱ्याचा विचार करण्याची वृत्ती वाढवावी म्हणजेच एकात्म मानव दर्शन होय. एकसंघ, समरस, एकात्म समाजाची निर्मिती करणे आवश्यक आहे. मनुष्य जीवनाचा, मूल्यांचा विचार करून प्रगती झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

सुशीलदादा वाजपायी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना एकात्म मानव दर्शनाचा आशय खूप मोठा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक शिवणे यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आतापर्यंत राबविण्यात आलेल्या व्याख्यानमालेचे तसेच अन्य उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतमाता आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कांचन तोडकर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महेंद्र जोशी यांनी केले. डॉ. शुभांगी कुलकर्णी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.